**निवासी विदेशी मुद्रा ( देश) खाते - भारतीय निवासी व्यक्तींसाठी सुविधा ए. पी. (डी आय आर सिरीज) परिपत्रक क्र. ६४ (डिसेंबर २४, २००२)**

**भारतीय रिझर्व बँक चलन नियंत्रण विभाग**
**केंद्रीय कार्यालय,**
**मुंबई- ४००००१**

**डिसेंबर २४, २००२**

ए पी ( डी आय आर सिरीज) परिपत्रक क्र. ६४
प्रति,
विदेशी मुद्रा व्यवहारातील सर्व अधिकृत व्यापारी

महोदया/ महोदय,

**निवासी विदेश मुद्रा ( देशी ) खाते-**
**निवासी व्यक्तींसाठी सुविधा**

सर्व अधिकृत व्यापारांचे, ए पी ( डी आय आर सिरीज) परिपत्रक क्र. ५३ दिनांक नोव्हेंबर २३, २००२, तसेच परिपत्रक क्र. फेमा. ७४/ २००२ - आर बी दिनांक नोव्हेंबर १, २००२, यांचेकडे लक्ष वेधण्यात येत आहे. वरील परिपत्रकात, काही विशिष्ट कामांसाठी, चलनी नोटा, बँक नोटा, आणि प्रवासी चेक यांच्या स्वरुपात रहिवाशांना मिळालेले विदेशी चलन, त्या रहिवाशांना, भारतातील अधिकृत व्यापाऱ्यांकडे, निवासी विदेश मुद्रा (देशी) खाते, उघडण्याची आणि कार्यान्वित ठेवण्याची परवानगी देण्यात आली असे सूचित केले गेले होते.

२. आता असे ठरविण्यात आले आहे की, वरील परिपत्रकात निदेश केलेल्या हेतु आणि रीतींव्यतिरिक्त, निवासी विदेश मुद्रा (देशी) खाते उघडण्यास/ त्यात जमा करण्यास, मिळविलेल्या किंवा जवळच्या नातेवाईकांना (कंपनी अधिनियमात व्याख्या केल्यानुसार) देणगी म्हणून दिलेले तसेच निवासी व्यक्तींना प्रमाणित बँक-वाहिनींमधून भरतात पाठविलेले, विदेशी चलानही भरता येईल. मिळविलेली विदेशी मुद्रा ही माल निर्यात करुन आणि / किंवा सेवा देऊन, स्वामित्वधन, मानधन या स्वरुपात असू शकेल.

३. परिपत्रक क्र. फेमा. ७४/ २००२ - आर बी दिनांक नोव्हेंबर १, २००२ मधील सुधारणा वेगळ्या पाठविल्या जात आहेत.

४. अधिकृत व्यापाऱ्यांनी या परिपत्रकातील मजकूर त्यांच्या संबंधित घटकांना कळवावा.

५. या परिपत्रकातील निदेश, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४२) च्या कलम १०(४) आणि कलम ११ (१) च्या खाली देण्यात आले आहेत.

आपला विश्वासू
**(जी. पद्मनाभन)**
**प्रभारी अधिकारी**